INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

April - May - June - 2023

E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's


# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 10, Issue-2

## Multidisciplinary Issue




Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

April - May - June - 2023 E-ISSN – 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Vol. 10, Issue-2

## Multidisciplinary Issue

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] India.

Executive Editors :
Dr. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : **www.researchjourney.net**

***Cover Photo** : The India's G20 Presidency guide the theme of - "Vasudhaiva Kutumbakam" or "One Earth. One Family. One Future" (Source) Internet.

© All rights reserved with the authors & publisher **Price : Rs. 1000/-**

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 10, Issue – 2 Multidisciplinary Issue
Impact Factor 6.625 Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April - June-2023

## INDEX


| No. | Title of the Paper | Author's Name | Page No. |
|---|---|---|---|
| | **English Section** | | |
| 1 | The Unforgettable Divide: Exploring Khushwant Singh's 'Train to Pakistan' and The Legacy of the Indian Partition | **Mr. Kunal Katkade** | 5 |
| 2 | A Study of Spiritual Intelligence of Tribal Students of Kavayitri Bahinabai Chaudhari , North Maharashtra University Jalgoan | **Dr. Swati Tayade** | 10 |
| 3 | Melanoma Detection using Image Processing Techniques: A Review | **Mr. Sunil Dhondu Mone, Dr. B. H. Barhate** | 18 |
| 4 | Batch Adsorption Study on Removal of Congo Red Dye by using Sugarcane Bagasse Activated Carbon | **Mahesh Vedpathak, Amit Divhare, Chandrashekhar Raut** | 29 |
| 5 | Unveiling Data Fabrication: Reasons and Consequences for Researchers | **Priya Kumari, Vikash Kumar** | 38 |
| 6 | Geographical Study of Population Projection of Nashik City in Maharashtra | **Sahebrao Deore** | 46 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 7 | मध्यकालीन मुस्लिम संत-दादू दयाल का काव्य-दर्शन | **डॉ ज्योति एन मंत्री** | 50 |
| 8 | विज्ञापनों में अनुवाद का महत्व और उपयोगिता | **डॉ. सूरज चौगुले** | 55 |
| | **मराठी विभाग** | | |
| 9 | बुद्धकालीन भारतीय स्त्री-पुरुषांच्या सामाजिक स्थितीचा तूलनात्मक अभ्यास | **डॉ. अमित गायधनी** | 60 |
| 10 | वेणास्वामीलिखित साहित्यावरील रामदासस्वामींच्या विचारधारेचा प्रभाव | **प्रा. डॉ. सुरेश जाधव** | 63 |
| 11 | जगाच्या कल्याणा संतांची विभूती | **सौ.तृप्ती तोडकर** | 71 |
| 12 | प्र. के. अत्रे : व्यक्ती आणि वाङ्मय | **डॉ. राजाराम सोनटक्के** | 75 |
| 13 | करंदीकरांच्या काव्यातून होणारे समाजातील विरुपाचे दर्शन | **डॉ. सुनंदा चरडे-दुबे** | 81 |
| 14 | कवी नामदेव ढसाळ यांच्या काव्यातील सामाजिकता | **प्रा. शशिकांत वि. काळे** | 88 |
| 15 | मानवी जीवनाचा शोध घेणारा काव्यसंग्रह 'केशरधागा' | **डॉ. आर. डी. शिंदे** | 92 |
| 16 | मराठी ग्रामीण साहित्य 'गावगाडा' | **डॉ.द.के.गंधारे, श्री प्रल्हाद पानसरे** | 96 |
| 17 | मीना प्रभू यांचे प्रवास वर्णनांतील योगदान | **सीमा शेळके** | 100 |
| 18 | भारतीय शिक्षणाचे विदेशीकरण व विदेशी विद्यापीठांची आव्हाने - एक समीक्षा | **डॉ. विद्युलता हांडे, उज्वला केदार** | 104 |
| 19 | २००५ नंतर डावी उग्रवादी चळवळीचा विस्तार आणि आज | **डॉ. एल. पी. वाघ, श्री. विनोद ग. एडलावर** | 112 |
| 20 | राष्ट्रीय वनधोरणाचे आदिवासी अर्थव्यवस्थेवरील परिणाम, विशेष संदर्भ गडचिरोली जिल्हा | **डॉ. संगीता हाडगे** | 119 |
| 21 | स्वयंरोजगाराद्वारे महिलांचे सक्षमीकरण | **डॉ. प्रज्ञा एस . जूनघरे** | 125 |
| 22 | पर्यटन विकासाचा रथ | **डॉ.सुलक्षणा कोळी** | 129 |
| 23 | विशेष आर्थिक परिक्षेत्राचा भारताच्या निर्यातीवरील परिणाम - एक अभ्यास | **सौ. डॉ. विद्युलता हांडे, गोरख वाघले** | 134 |
| 24 | लोकशाही यशस्वी करण्यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार | | 140 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Vol. 10, Issue – 2 : Multidisciplinary Issue
Impact Factor 6.625
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April - June-2023

# मानवी जीवनाचा शोध घेणारा काव्यसंग्रह 'केशरधागा'

डॉ.आर.डी.शिंदे.
मराठी विभाग
कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने,
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी
ईमेल rdshinde2012s@gmail.com

**सारांश :**

इगतपुरी सारख्या आदिवासी तालुक्यात अनेक नवोदित कवी सातत्याने नवसाहित्य निर्माण करीत आहेत. या नवोदित कवींनी काव्यलेखनाच्या माध्यमातून आदिवासी जनजीवन, आदिवासी समाज, संस्कृती आदिवासींच्या समस्या यांच्यासह मानवी जीवनाचा आणि त्यांच्या मनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आदिवासी भागातील नवोदित कवी पैकी योगेश उगले हे एक नवोदित कवी आहेत. यांचा 'केशरधागा' हा कवितासंग्रह आध्यात्मिक विचारांसह, स्व. जीवनानुभव प्रकट करीत आहे. मानवाला आलेले स्व:नुभव, आणि जीवनातील वेदनेचा हुंकार काव्याच्या माध्यमातून वाचकापुढे मांडलेला आहे. या काव्यसंग्रहाचे विवेचन पुढील निवडक घटकांच्या अनुषगांने करण्यात येईल.

**गृहिते :**

१) जीवनानुभवाचा शोध घेणे.
२) मानवी वेदनेचा शोध घेणे.
३) मानवी जीवनाचा आशावाद शोधणे.

**संशोधन पद्धती :**

शोध निबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**मानवी जीवनचिंतन करणारा 'केशरधागा':**

मानवी जीवनाचे चिंतन, मनातील निर्मल भक्तीभाव यांच्यासह मानवासाठी भविष्य विषयीचा नवा आशावाद मांडतात. कवी जीवनाकडे सकारात्मक बघण्याचा दृष्टीकोण वाचकांना दर्शवितात. दु:ख हे मानवी मनात आणि जीवनात कायम सहवास करीत असते. कधी अचानक येते कधी नकळत लृप्त होते, तर कधी मानसाला कायम छळत असते. या दु:खाला समर्थपणे सामोरे जाण्यासाठी मनाची स्थिरता माणामध्ये असावी लागते. जीवनात आलेल्या दु:खावर मात करण्यासाठी मनात मोठी शक्ती निर्माण करावी लागते. ही शक्ती मनाचा समजूतदारपणा, सहनशीलता आणि प्रत्येक घटनेकडे सकारात्मकदृष्टीचा विचार यांच्यामुळे निर्माण होत असते. मानवी मनाचा विचार आणि जीवनाची दिशा या संदर्भात कवीने काव्यात व्यक्त केलेला विचार वाचकांना विचार करायला लावतो. संघर्षाला सामोरे जाणे हा कवीचा स्वभाव आहे. संघर्ष हा जीवनाचा एक भाग आहे. संघर्षाशिवाय माणूस असू शकत नाही. हे कवीने दाखविण्याबरोच, संकटाला समोर ठेऊन जिद्द, आत्मविश्वास, मनस्वी आनंद आणि सच्चेपणा या गोष्टीमुळे अशी आनेक वादळे अथवा संकटे दूर करू शकतो. संघटकांचा विचार न केल्यास जगण्याची नवी आशा, नवा दृष्टीकोण मानवास कला कवी काव्याच्या माध्यमातून शिकवता. हे आपण या काव्यसंग्रहातील निवड कवितांच्या आधारे कवीने मानवी मनातील विचारांचा घेतलेला शोध या निबंधात मांडलेला आहे. याचा पुढील घटकांच्या आधारे अभ्यास करू

आत्मचिंतन :

आदिवासी भागातील कवी योगेश उगले यांचा जीवनपट उलगडून दाखविताना लहानपणापासून त्यांना अनेकदा दु:ख आणि संकटांना समाना करावा लागला हे कवीने काव्याच्या माध्यमातून व्यक्त केले आहे. घरातील गरीबी आणि गरीबीमुळे करावा लागणारा संघर्ष हा काव्याच्या माध्यमातून व्यक्त होताना दिसतो. त्यामुळे कवीचे काव्य हे आत्मअनुभवातून प्रकट झालेले आहे. कवीने व्यक्तीगत जीवन विषयीचे विचार मांडताना, प्रा. गोरख जगताप लिहितात, '' काव्याला अनुभवाचा प्रत्यय असेल तर वाचकाला अगळीवेगळी अनुभूती येत असते. अल्पकाळात पितृछत्र हरपल्याने घराने घरपण जपताना, जबाबदारीचे आभाळ तोलताना इतक्या वेदना झाल्या की लाकडाची मोळी व्हावी तशी 'वेदनांची मोळी' झाली…'' १ कवीने एका बाजूला वैयक्तिक जीवनाची आणि त्यातून परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या दु:खाची मोळी बांधलेली सोबत घेऊन फिरत आहे. अशा परिस्थितीतही कवी आपल्या जीवनाकडे नवी आशा लावून बसलेला आहे.आपल्या जीवनाची कहानी मांडताना 'पंथ' या कवितेत ते लिहितात

''माझी वेदनांची मोळी मीच बांधुनिया आलो
देहावेगळया धनाची मीच साठवण झालो.''२

आपल्या नशिबाच्या झोळीत जे जे चांगले अथवा वाईट आलेले आहे. ते ते कवीने सहज स्वीकारले आहे. कारण कवीच्या जीवनाचा आणि मनाचा पंथच वेगळा आहे. समोर जे आले त्याला सामोरे जात शांतपणे आणि सकारात्मक वृत्तीने जगण्याचे कवीने ध्येयच ठेवले आहे. कवीचा जीवनाकडे आणि परिस्थितीकडे बघण्याचा दृष्टीकोण सकारात्मक आहे. हे आपणास नवी उमेद देऊन जातो.

कवीला आलेले जीवनानुभव संघर्षमय आहे. संघर्षमय प्रसंगी आपली वाट आपणच चालावी असे कवीला वाटते. काळाच्या ओघात एकटेपणा आपलासा वाटू लागला. या एकटेपणाला सोबत घेतले. एकटेपणात जगण्याची आणि संघर्ष करण्याची उमेद निर्माण होत असते. कवीला जगापासून दूर जावून एकटेपणा हवा आहे. म्हणून 'एकटेपणा' या कवीतेत ते लिहितात

'या एकटेपणात मला कुणीच नकोय, अगदी मी सुद्धा. इथे सदैव
दरवळावी फक्त ज्ञानदेवीय विश्वगंध, प्राणांतून उगम पावेल कधीतरी
एखाद्या प्रेमयुगात ओवीत वाहणारी शब्दगंधा,त्या युगाची मी वाट पाहीन.'३

माणसाच्या जीवनात अशी वेळ येईल की, जीवनात नवी आशा निर्माण करेल. मनात निर्माण झालेले वाईट विचार दूर होतील. मरणाप्राय वेदना देणारा एकटेपणा कधीतरी दूर होईल. कवीला विश्वाचे रूप पहावयाचे आहे. त्यासाठी एकलेपण गरजेचा आहे. अशा प्रसंगाची कवी वाट पाहत आहे

कवीचे दु:ख वेदना या त्यांच्यासाठी कवीचे अंभग असल्याचे जाणवतात. काव्याचे अभंग वाचन करीत असताना, कवीचा जीवन अनुभव मोठा असल्याचे जाणवतो. आपल्या मनातील वेदना, संघर्ष दुसऱ्यांना सांगावे असे कवीला अनेकदा वाटत होते. पण त्यांनी कायम पोटातच ठेवले. जुने नवे वादळाचे काटे आणि दु:ख कवेत घेत जगताना कवी लिहितात,

''काही जुने काटे । काही नवे दु:ख ।
आयुष्य सन्मुख। वादळाच्या '' ४

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | E-ISSN : 2348-7143
Impact Factor 6.625 | Vol. 10, Issue - 2 : Multidisciplinary Issue | April - June-2023
Peer Reviewed Journal

आयुष्यातील जुने आणि नव्याने निर्माण होणाऱ्या वादळांना आपल्या गीतीत कवी वाचकाला नवा दृष्टीकोण देत आहे. आयुष्यातील दुःख, संकटे आणि संघर्ष यातून सहज शांतपणे समर्थपणे उभा राहून जीवनाकडे पाहण्याना सकारात्मक विचार वाचकास विचार करायला लावतात.

**मनातील वेदनांचा हुंकार :**

मानवी मनातील वेदनांचा हुंकार काव्याच्या माध्यमातून व्यक्त करताना, कवी योगेश उगले हे आपल्या आयुष्यात आलेल्या दुःखाला स्पर्श करीत असतात. या दुःखात आपल्या सहचारीणीला मात्र दूर ठेवण्याचाा प्रयत्न करतात. म्हणून ते 'स्पर्शप्रणाली' या काव्यात लिहितात,

'' उसळुनि येता दुःख युगांचे नयनी रोखूनी धरतो पाणी
पदर तुझाही भिजेल इतके तुझ्याही कुशीत शिरतो राणी
या दुःखावर नित्य अनावर तुझाच गहिवर दाटुनि येतो
थेंब थेंब ओथंब तुझा मी असाच अलगद वेचुनि घेतो.'' ५

कवीच्या मनात दाटून आलेल्या भावनांना वाट मोकळे करण्यासाठी आश्रू धावत येतात. कितीही संकटे आली.दुःख झाले. अशा प्रसंगी आपल्या सहचारिणींशी मन मोकळे करावे असे कवीला वाटते. अश्रू कितीही आले तरीही त्या आश्रुमुळे सहचारिणीला वेदना होणार नाही असा मनस्वी विचार करणारा कवी वेगळा दिसतो. दुसऱ्या बाजूने भांडवलशाही व्यवस्थेत जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी आणि त्याची होणारी अवस्था या संदर्भातील चित्रण करताना, कवी लिहितात,

'' किती तो राबला काही दिसेना सातबाऱ्यावर
तरीही लक्ष आहे आज त्याच्या शेतसाऱ्यावर
नशीबी दुःख हाती मोल नाही येत कामाचे
असे तो नेहमी जगतो उभे आयुष्य वाऱ्यावर '' ६

भांडवलशाही युगात आणि सावकारी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या कष्टाला न्याय मिळत नाही. दिवसरात्र शेतात राबून देखील त्याच्या शेतावरील कर्ज फिटत नाही. त्याचा सातबारा कोरा होत नाही. आयुष्यभर कष्ट करणारा शेतकरी हा कष्टाशिवाय त्याच्या नशिबी कोणतीच प्रगती होत नाही. आपल्या कामाचे घामाचे मोल मिळत नाही. याची खंत वाटते.खरे तर कवीच्या काव्यातील शेतकरी जीवनाची व्यथा नसून संपूर्ण शेतकरी जीवनाची व्यथा आहे. आपला शेतकरी सुखी आणि कर्जमुक्त होण्यासाठी सर्वच पातळीवर नियोजन करण्याची गरज आहे.

**प्रेमभावनेचा अविष्कार :**

प्रेमभावना ही मानवी मनातील स्थीर अवस्था आहे. भारतीय संस्कृतीमधील श्रीकृष्ण आणि राधा यांचे अतुट नाते कवीला भावते. कृष्ण आणि राधा यांच्या प्रेमळ भावनेचे आणि स्नेहाचे संबंध व्यक्त करताना कवी लिहितात,

''बघ दूर सागरी आले ते पाय कुणाचे राधे?
पायांतच यमुना आणि काठावर कृष्णा विराजे '' ७

कवीने काव्यातून व्यक्त केलेले प्रेम हे निर्मळ आहे. या निर्माळ प्रेमाबरोबरच निर्मळ भावना आपल्या काव्यातून वाचकांपुढे मांडतात.

सारांश :

कवी योगेश उगले यांचा 'केशवधागा' हा कवितासंग्रह मानवी मनाचा विचारांचा वेध घेण्याबरोबरच मानवी प्रेमभावनांची जपणूक करणारा आहे. संघर्ष करणे हा मानवी जीवनाचा स्थायी भाव आहे. मानवी जीवनात कधीही कितीही संकटे आली तरीही आपण कोणत्याही परिस्थितीत न डगमगता त्याला सामोरे गेले पाहिले. आपण कितीही दु:खी कष्टी असलो आणि वेदनेचा बळी ठरत असलो तरीही आपली सहचारिणीस मात्र कोणतेही दु:ख सहन करावे लागू नये, असे कवीला वाटते. मानवी जीवनातील भावभावनासह जगाचा पोशिंदा असणारा शेतकरी राजा जगला पाहिजे असे कवीला वाटते. त्याच्या जीवनाचा उद्धार झाला पाहिजे. त्याच्या आयुष्यातील भोग आणि दु:ख दूर झाले पाहिजेत. कारण तो सुखी तर जग सुखी असा विचार मांडणारा कवी वाचकांना विचार करायला लावतो. जीवनाकडे व शेतकऱ्याकडे सकारात्मक विचाराने पहावे असा विचार कवी मांडता.

संदर्भ :

१. जगताप गोरख, *'केशरधागा'*, नाविन्य प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क ६
२. उगले योगेश, *'केशरधागा'*, नाविन्य प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क १३
३. उगले योगेश , 'केशरधागा', नाविन्य प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क १६
४. योगेश उगले, *'केशरधागा'*, नाविन्य प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क २९
५. योगेश उगले, *'केशरधागा'*, नाविन्य प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क १४
६. योगेश उगले, *'केशरधागा'*, नाविन्य प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क ६५
७. योगेश उगले, *'केशरधागा'*, नाविन्य प्रकाशन, पुणे,प्रथम आवृत्ती २० जून २०२१ पृष्ठ क २५